# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक 27.07.2012 (का.प.क्रं.07) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक 27.07.2012 (का.प.क्र.07) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.35 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला आयुक्त, श्री.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से, प्र.नगर सचिव तथा उपआयुक्त (प्र) श्री.रविंद्र निकम यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्री.आगा खान मिया खान
05. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
06. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
07. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
08. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
09. स. श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
10. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
11. स. श्री.मो.मुजीबोद्दीन कदीरोद्दीन
12. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप
13. स. श्री.समीर सुभाष राजुरकर

**चर्चा :**

**श्री.आगा खान मिया खान** :आजची महत्वाची बैठक आहे अधिकारी उपस्थित नाही. अधिकारी येणार असेल तर सभा घ्यावी नसता तहकूब करावी.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :कोणती बैठक महत्वाची असते. अधिकारी हजर नसेल तर प्रश्न प्रलंबीत राहतात. अधिकारी बैठकीला हजर असणे आवश्यक आहे.

**मा.सभापती** :यापुर्वी अधिकारी यांनी उपस्थित राहण्याबाबत सुचना दिलेल्या आहे. महत्वाचे विषय आहे. कोणतेही कामे होत नाही . बैठकीला मा.आयुक्त उपस्थित असणे आवश्यक आहे. मा.आयुक्तांना बोलवून घ्यावे. तो पर्यत ही सभा तहकूब करण्यात येते.
(वेळ सकाळी 11.35 वा.पुन्हा सभा 11.40 वा.सुरू)
यावेळी मा.आयुक्त हे बैठकीला हजर होतात.

**श्री.आगा खॉन** :किती रस्त्याची कामे डिफर पेमेंन्टवर सुरू झाली किती कामे झाली किती बाकी आहे. त्याचा कालावधी किती होता. जे मटेरियल वापरले त्याची प्रत तपासणी केली होती.

**श्री.रेणुकादास वैद्य** : किती रस्त्याची कामे हाती घेतली बजेट मध्ये तरतूद होती का ? कोणत्या रस्त्यासाठी किती रक्कम खर्च होत आहे यास सक्षम प्राधिकरणाची मंजूरी आहे का अंदाजपत्रक कुणी केले पीएमसी नेमली का सर्व माहिती दयावी.

**श्री.नारायण कुचे** :पावसामूळे या रस्त्याची कामाची वाट लागली आहे. मा.आयुक्तानी पाहणी केली संबधीताची बिले थांबविण्याचे आदेश दिले खालचे अधिकारी त्यांचे पालन करीत

नसेल तर योग्य नाही. या संदर्भात चौकशी समिती नियुक्त करावी ठेकेदारावर पोलीस गुन्हा दाखल व्हावा.

श्री.बाळासाहेब मुंडे :दोन दिवसापूर्वी रोपळेकर हॉस्पीटल जवळ चालू असलेले रस्त्याचे काम तेथे डांबराची फवारणी मारून कछ टाकून लोरींग ने कछ दाबवण्याचे काम चालू होते. अशा पध्दतीने रस्त्याचे काम होत असेल तर त्यास बील देणार का ?संबधीतावर कार्यवाही व्हावी.

श्री.गिरजाराम हळनोर :शहरातील हे अतंर्गत रस्ते आहे अंदाजपत्रक तयार करतांना कोणते नियम वापरले जात आहे.हे नॅशनल हायवे रस्ते आहे मोठी वाहतूक असणार आहे.कोणत्या बजेट मधील खर्च होत आहे स्पेशीफिकेशन काय नॉर्मस् कोणते वापरले त्याची आवश्यकता होती का जे नॉर्मस् वापरले त्याप्रमाणे रस्त्याचे काम झाले का या रस्त्यावर योग्य प्रतीचे मटेरियल वापरले का वापरले असेल तर ते निष्कृष्ठ का झाले.यावर देखरेख कोण करते या रस्त्यावर वापर किती व कोणत्या प्रकारची वाहतूक होती किती वजनाचे वाहने जातात यांचे सर्व माहिती नमूद केली का ? अंतर्गत रस्त्यासाठी मोठा खर्च करतो त्याप्रमाणे काम होते का याची चौकशी व्हावी.

मा.सभापती :या बाबत खुलासा करावा.

शहर अभियंता :स.सदस्य श्री. रेणुकादास वैद्य यांचे दिनांक 18-7-2012 चे पत्र पात्र झाले यात डिफर पेमेंन्टवरील रस्ते असे मेन्शन नाही फक्त शहरातील रस्ते माहिती व नंतरचे जे आपले प्रश्न आहे पत्र प्राप्त आहे त्यानुसार सर्व कार्य.अभियंता यांना पत्र दिले व आपआपल्या प्रभाग नुसार कोणकोणती रस्त्याची कामे झाली तीन दिवसात माहिती देण्याचा अहवाल मागविला एकत्रित माहिती स.सदस्य श्री. वैद्य यांना देण्यात येईल.तसेच डिफर पेमेंन्टची गेल्या वर्षी व या वर्षातील अशी दोन प्रकारे काम चालू आहे नेमकी कोणत्या कामाची माहिती पाहिजे आहे दोन्ही पाहिजे असेल तर वेळ लागेल वेळ दयावा.

श्री.आगा खान मिया खान :मागिल वर्षीची कामे झाली असेल त्याची माहिती दयावी.याची पीएमसी चेकींग झाली.

शहर अभियंता :त्याची डिटेल माहिती आपणांस लेखी स्वरूपात देण्यात येईल.

श्री.नारायण कुचे :सभा तहकूब करावी आताच तपासणी करावी. यात 50 टक्के भ्रष्टाचार होतो आहे जिल्हाधिकारी कार्यालया जवळील रस्त्याची पाहणी आताच करावी.

शहर अभियंता :हा रस्ता पुर्ण झालेला नाही.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत होते.

मा.सभापती :रोहिदास पुरा येथील रस्ता खराब झाला असल्याचे स. श्रीमती वाडेकर यांनी लक्षात आणून दिला पुन्हा केला जाईल असे प्रशासन सांगते तर जेंव्हा रस्ता काम चालू होते त्यावेळी संबधीत अधिकारी काय करीत होते.

श्री.नारायण कुचे :संबधीत बिल्डरास ब्लॅक लिस्ट करण्यात यावे.

श्री.आगा खान मिया खान : जो पर्यत कार्यवाही होत नाही तोपर्यत सभा तहकूब करावी.

यावेळी एकाच वेळी स.सदस्य बोलत असतात.

मा.सभापती :अनेक ठिकाणची निष्कृष्ठ दर्जाची कामे चालू आहे. या बाबत मा.आयुक्तानी कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

श्री.नारायण कुचे :व्हीआयपी फन्शन हॉल समोर रस्त्याचे निष्कृष्ठ दर्जाचे काम होत होते आताच बघीतले पेपरला बातम्या येतात महापालिकेची बदनामी होते आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : हा सर्व विषय शहर अभियंता यांचे आखत्यारीत आहे. कोणता खुलासा देवू वेळ लागेल असे म्हटले जी तोडफोड केली 40 कोटीची कामे होत आहे त्याचा अर्थसंकल्पात कुठेही तरतूद नाही सभागृहाची मंजूरी नाही सर्व प्रशासनाच्या

मनाने आवश्यकता होती म्हणून आम्ही सर्व प्रशासनाच्या पाठीशी होतो परंतु आवश्यकता होती म्हणून आम्ही यासाठी साथ दिली.

श्री.नारायण कुचे :मा.महापौरांनी मंजूरी दिलेल्या कामे होत नाही हे विना तरतूद कामे केली का?

श्री.रेणुकादास वैद्य :डिफर पेमेंन्टचे रस्ते घेतले रस्ता रूंद व्हावा विकास व्हावा म्हणून सर्व सदस्य स.पदाधिकारी मा.खासदार, मा.आमदार सर्व प्रशासनाच्या पाठीशी होतो. सदस्यांच्या वार्डातील 25 लक्षचे कामाचे संचिकेवर स्थळ पाहणी, चर्चा करा असे येते स्थळ पाहणी वेळेवर होत नाही 25 लक्षचे अंदाजपत्रक 40 लक्ष होते काम होण्यास विलंब होतो. परंतु जी रस्त्याची कामे केली त्या संचिकेवर कुठेही चर्चा करा , स्थळपाहणी वगैरे लिहिले नाही अर्थसंकल्पात तरतूद बाबत काही म्हटले नाही असे असतांना ही कामे मार्गी लावण्याचे ठरविले चार पदरी रस्ता होत आहे वैजापूर ते औरंगाबाद त्यांची प्रत मागावी त्यात जे स्पेशीफिकेशन गुंतक आहे त्यापेक्षा यात जास्त आहे.गुंलमंडी रस्त्यावरून साधी रिक्षा जात नाही त्यापेक्षा हायवेवरून स्पेशीफिकेशन का वाढले रस्त्याची कामे करीत असतांना किती व कोणते मटेरियल प्रमाणात टाकले ताळमेळ नाही. एखादा रस्ता आहे त्याचे चार लेअर व्यवस्थित झालेले नाही रस्त्याचे काम म्हणजे डांबरीकरण केले काम झाले असा अर्थ होत नाही त्या रस्त्यात पाणी ड्रेनेज तसेच जीटीएलची कामाचा विचार का होत नाही.स.सदस्य श्री.आगा खान यांनी विनंती केली की सर्व लाईन क्रॉस जोडण्यापेक्षा रस्त्याच्या एका साईडला घ्यावे त्यावर ती जोडून घेवू असे म्हटले परंतु पुन्हा रस्ता खोदणार खड्डे पडणार काम करावे लागणार हे चक्रविव्ह कशासाठी कोणत्याही रस्त्याचे स्पेशीफिकेशन नुसार काम झालेले आहे का एखादा तरी रस्ता दाखवा आताच पाहणी करावी तोपर्यत सभा तहकूब करावी.

श्री.नारायण कुचे :पेव्हर ब्लॉकचे कामाची तपासणी करावी. बातम्या येतात बदनामी होत आहे.

श्री.आगा खान मिया खान :सभा तहकूब करावी.

मा.सभापती :पेपरला बातमी येते मुदतपुर्व डांबरीकरण रस्ता खराब झाला तर पुन्हा तो ठेकेदार रस्ता तयार करून देण्याची तयारी ठेवतो यात संबधीत गुंत्तेदार यास ब्लॅक लिस्ट व संबधीत जे.ई असतील त्यांचे कार्यवाही व्हायला पाहिजे.

श्री.आगा खान मिया खान :रस्त्याचे नव्याने काम होत आहे रस्ता तयार होतो नंतर लाईन टाकल्या जातात त्यावर पीसीसी होत नाही कारण काय ?

श्री.रेणुकादास वैद्य :आताच म्हटले की रस्त्याची कामे पुर्ण झाली नाही. डिफर पेमेन्टचा अर्थ समजत नाही पेमेंन्ट अगोदर की काम झाल्यानंतर कामच पुर्ण नाही तर पैसे कशाचे मागतात.

मा.सभापती :सभागृहाच्या भावना लक्षात घेता कशा पध्दतीने काम होणार आहे खुलासा करावा.

श्री. नारायण कुचे :डिफर पेमेंन्टवर किती रस्ते झाले किती रक्कम लागणार आहे किती रस्त्याची कामे पुर्ण झाली किती बाकी आहे आणखी खर्च किती लागणार व पेमेंन्ट कसे देणार आहे.

शहर अभियंता :दोन प्रकारे रस्त्याची कामे चालू आहे मागिल वर्षाचे स्पील ओव्हर म्हणून व या वर्षाचे काम चालू आहे या वर्षी शहरात 30 कोटी व एमआयडीसी चिकलठाणा भागात 20 कोटीची कामे चालू आहे यातील शहरातील 40 व चिकलठाणा भागातील 60 टक्के काम झाले स.श्री.समीर राजूरकर यांचे वार्डातील एक रस्ता तसेच कोकणवाडी चौक ते पंचवटी रस्ताचे काम काम पूर्ण झाले सिल्लेखाना ते वरद गणेश मंदीर रस्ता पूर्ण झाला किराडपूरा रस्त्याचे काम चालू केले होते 200 फुटचा रस्ता त्यावर 6 जागेच्या संदर्भात स्टे आला.

श्री.आगा खान मिया खान :आझाद चौकाच्या रस्त्याचे काम बाकी आहे.

| | |
|---|---|
| **शहर अभियंता** | **:काम राहिलेले आहे. जेथे स्टे नाही ते काम चालू केले पाहणी केली परंतु त्या लोकांनी काम बंद पाडले.** |
| **श्री.नारायण कुचे** | **:स्टे काय आहे विधी विभागाकडून माहिती घ्यावी.** |
| **श्री.आगा खान मिया खान** | **:दुभाजकाचे काम ही झाले नाही.** |
| **मा.सभापती** | **:मुख्य दुभाजकाला स्टे नाही काम करण्यास हरकत नाही.** |
| **श्री.मो.मुजीबोद्दीन** | **: किराडपूरा रस्त्याचे एका बाजूने काढले दुसरी साईड सोडली अर्धवट काम केले.** |
| **प्रशासकीय अधि.** | **:किराडपूरा रस्ता रूंदीकरणाचे काम अर्धवट राहिले होते नगररचना विभागा व प्रशासकिय विभागाने संयुक्त पाहणी केली नगररचना विभागाने ज्या पध्दतीने मार्कींग दिली त्यानुसार कार्यवाही केली 30-40 पायरी सिडया होत्या उजव्या बाजूचे मार्कींग दिले नव्हते. त्यामूळे पथक परत आले.** |
| **श्री.रेणुकादास वैद्य** | **:स्टे नेमका कुठे आहे हे शहर अभियंता यांनी माहिती घ्यायला पाहिजे.** |
| **शहर अभियंता** | **:विधी सल्लागार यांचे कडून माहिती घेतली होती काम बदं करण्याचे म्हटले नसता आयुक्तावर कन्टेम होईल.** |
| **विधी सहाय्यक** | **:किराडपूरा रस्ता रूंदीकरणाच्या संदर्भात 6 प्रॉपटीच्या संबधी रिट पिटीशन दाखल झाले जे मिळकत धारक आहे त्यांनी त्यांची प्रॉपटी कायदेशीर पध्दतीचा अवलंब न केल्यामूळे त्यांचे पजेशन घेवू नये अशी याचिका दाखल केली मा.न्यायालयाने सुनावणी घेवून या लोकांनी पॉपर्टी कायदेशीर पध्दतीचा अवलंब केल्याशिवाय ताब्यात घेवू नये पजेशन मध्ये हस्तक्षेप करू नये असे निर्देश दिले .** |
| **श्री.रेणुकादास वैद्य** | **:ज्या प्रॉपटी महापालकेकडे आहे त्यावर काम करण्यास हरकत काय** |
| **श्री.आगा खान** | **:रस्ता रूंदीकरण करण्यास भुसंपादनाचा प्रश्न येत नाही** |
| **विधी सहाय्यक** | **:सीटीएस नं. दिले आहे त्यावर हस्तक्षेप करू नये असे सांगितले** |
| **मा.सभापती** | **:त्या प्रॉपर्टीज सोडून इतर ठिकाणी व दुभाजकाचे काम करता येते ते करावे.** |
| **श्री.रेणुकादास वैद्य** | **: 6 प्रॉपर्टीजचा प्रश्न होता त्या हस्तगत करण्यासाठी जी कार्यवाही करणे अपेक्षीत होते ती केली नाही शहर अभियंता यांनी पाहणी का केली नाही संचिकेनुसार का गेले नाही** |
| **शहर अभियंता** | **:स्टे असलेले सोडून बाकीचे रस्त्याचे जे काम करता येईल ते केले.** |
| **मा.सभापती** | **:ही सर्व कामे केंव्हा व कशी व चांगल्या पध्दतीने होती प्रशासनाने शब्द दयावा.** |
| **शहर अभियंता** | **:जकात नाका,कोकणवाडी, समर्थनगर हे शहरातील रस्तेचे काम झाले एमआयडीसीचे 70 टक्के काम झाले.** |
| **मा.सभापती** | **:शहरात एकूण किती रस्ते होत आहे काम देवून किती कालावधी झाला.** |
| **शहर अभियंता** | **:एक वर्ष झाले आहे.** |
| **मा.सभापती** | **:किती कामास सुरूवातच केली नाही. संबधीत अभियंता कोण आहे** |
| **शहर अभियंता** | **:ते आज आजारी असल्याने आले नाही.अर्धा तासात लेखी लिस्ट आपणाकडे दिली जाईल.** |
| **मा.सभापती** | **:स्थायी समिती बैठक असतांना आजारी रजा देणे वगैरे होत राहिल्यास सभागृहात खुलासा कोण करणार आहे.** |
| **श्री.रेणुकादास वैद्य** | **:कोणताही रस्ता घ्यावा यास नॅशनल स्पेशीफिकेशनची आवश्यकता होती का,लाखो रूपयाचा महसूल रस्त्याच्या कामासाठी वाहून जात आहे.गंभीर बाब आहे.** |
| **मा.सभापती** | **:5 लक्षचे काम वार्डात होत नाही संजय नगर भागातील रस्त्याचे काम कोणी केली** |
| **श्री.नारायण कुचे** | **:चौकशी समिती नेमावी.** |

**मा.आयुक्त** :शहरात जे रस्ता रूंदीकरणाचे काम होती घेतले त्या अनुषंगाने किंवा त्यापुर्वीही जे डिफर पेमेंन्टवर रस्ते घेतले होते या कामाचे विषयी गुणवत्तेविषयी व टाईम लिमीट विषयी प्रश्न उपस्थित केले हे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न सुरू केले त्याचाच एक भाग म्हणून काल सर्व ठेकेदारास बोलवून काय अडचणी आहे याचा अंदाज घेतला व संबधीत कार्य.अभियंता, इतर स्टाफ तेथे जाईल व ज्या अडचणी असेल त्या सोडविण्याचा प्रयत्न करू विनाकारण वेळ का लागला याचाही खुलासा घेतला जाईल परंतु ते उपस्थित नाही.किराडपूरा भागातील रस्त्याला 19 तारखेला मा.महापौर यांचे बरोबर भेट दिली होती असे लक्षात आले की 2-3 महिण्यापूर्वी रस्ता रूंदीकरण केलेल्या ठिकाणी काही मालमत्ता तशाच होत्या.काही खाजगी लोकांनी तक्रार केली की हा रस्ता मोकळा पूर्ण झाली नाही ज्यावेळी या रस्त्याला भेट दिली त्या वेळी संबधीत अधिकारी यांना योग्य त्या सुचना दिल्या होत्या त्यावेळी असे कळले की 5 लोकानी स्टे आणलेला आहे.तेच सांगितले की योग्य ती प्रक्रिया केल्या शिवाय त्यांचे ताबे घेवू नये ताबा घेतला परंतु ते रस्त्याचे काम होवू देत नव्हते सी.स. नं 11871 यात चार व आणिखी 2 असे एकूण 6 स्टे लोकांचे स्टे आणले ते सोडून बाकीचे सर्व कार्यवाही करावी हेच सांगितले होते या संदर्भात ताबडतोब ॲडव्होकेट नेमा बोर्डावर केस कशी घेतली जाईल ते पहावे सर्व फोटो काढावे कोर्टास सादर करावे की या रस्त्यावरील बाकी सर्व ताब्यात घेतले जे राहिले त्यांना जे पाहिजे ते देण्याची तयार आहे तेच नेमका काय पाहिजे मागत नाही म्हणून तेवढयामूळे रस्ता थांबला आहे अशा प्रकारचे आदेश केले होते थोडया फार प्रमाणात वादग्रस्त होते किंवा नव्याने काही लोक बसले होते तेथे संबधीत अधिकारी पाहणीसाठी गेले त्यांचे समाधान झाले नाही त्या 5 लोकांना चर्चेसाठी बोलविले होते त्यांचे काय म्हणणे आहे तो सोडविण्याचा प्रयत्न करतो तसेच किराडपूरा येथील लोकांना बोलविले मछली खडक येथील 70-80 लोकांना बोलविले होते या सर्वांना आवाहन केले की चर्चा करावी जी समस्या आहे ती सोडविण्याचा प्रयत्न करतो दुस-या दिवशी कैलासनगर चे 12 लोक आले 5-6 लोक किराडपु-याचे होते ज्याचा स्टे होता ते लोक आले नाही.परंतु टप-या व जागा त्यांचे ताब्यात होत्या तो तोडण्याचा कार्यक्रम 2 दिवस घेतला दीड दिवसा 20 ओटे 25 शेडस्,8 जिने 3 दुकाने व 6 टपऱ्या एका व्यक्तीचे राहिलेले आहे दुसरी सुचना अशी दिली की जे लोक न्यायालयात गेले त्यांचे संपर्क करून कार्यवाही करावी व जी मोकळी जागा आहे तेथे काम सुरू करावे काल या संदर्भात बैठक घेतली कैलानगर रस्त्याची शेवटपर्यत पाहणी केली काय अवस्था आहे कुठे कमी पडतो आहोत गुणवत्तेच्या बाबतीत तक्रारी आहे यासाठी पीएमसी नियुक्त केली त्या विषयी तक्रारी आहे म्हणून टेक्नीकलचे श्री.काझी यांना आज सकाळी गव्हरमेंन्ट इंजिनिअरीगचे प्राचार्य यांचेकडे पाठविले या रस्त्याची तपासणी करावी म्हणून म्हटले ही तपासणी होत नाही. तोपर्यत पुढील बीले दिली जाणार नाही ते दिनांक 1-8-2012 पासून तपासणी करू असे सांगितले तात्रिक पध्दतीने तपासणी व्होऊ दयावी त्यांचा जो सल्ला येईल त्यानुसार कार्यवाही करू.

**श्री.गिरजाराम हळनोर** :जे नॅशनल हायवेच्या धरतीवर अंदाजपत्रक बनवणे त्या रस्त्यावर वाहतूक किती किती वजनाची वाहने जाणार आणि आपण जे अंदाजपत्रक बनवले त्याची आवश्यकता आहे का?

**श्री.आगा खान मिया खान** :कैलाननगर रस्त्याची मा.आयुक्तांनी पाहणी केली परंतु काही लोक दिशाभूल करीत आहे. 6-6 महिण्याला पुन्हा पुन्हा तेंच ते काम करायचे खर्च करायचा ही पध्दत बदं व्हावी. ड्रेनेज, पाणी पुरवठा लाईन ही रस्त्याच्या बाजूला

असावी जे मटेरियल टाकले ते आयएसआय मार्क आहे का? तसेच रस्त्याचे जे काम केले त्यावर पीसीसी केली होती का ? सभागृह नेता, मा.सभापती यांनी पाहणी केली साईडला लाईन असाव्यात हेच म्हणणे आहे या लाईनचे व्हॉल रस्त्यात आले आहे ते 9 वॉल दबले आहे.

शहर अभियंता :या लाईन रस्त्याच्या साईडला पाहिजे यास मंजूरी मिळाली परंतु पाणीपुरवठयाच्या लाईनसाठी मान्यता मिळाली नाही. त्यावेळी सांगण्यात आले की समांतर जलवाहिनीतून हे कामे होतील.

श्री.आगा खान मिया खान : जो खुलासा केला योग्य नाही 4 दिवसांपासून घाण पाणी येत आहे काम करतेवेळी वार्डाचे स.सदस्य यांना विचारणा करायला पहिजे. तसे होत नाही.

मा.सभापती :किती कोटिचा रोड आहे. त्याखाली पाईप लाईन आल्या प्रॉब्लेम आला तर कसे काम करणार आहे रस्त्याच्या साईडला लाईन पाहिजे

शहर अभियंता :4 कोटीचा रोड आहे. या लाईन बदलण्या बाबत वारंवार कार्य.अभियंता यांना समोर आणून दिले.

मा.सभापती :4 कोटी रोडचे काम चालू आहे. परंतु प्रशासनाचा ताळमेळच नाही.

श्री.आगा खान मिया खान :पब्लिकच्या हिताचे जो पर्यंत काम होत नाही तो पर्यंत रोडवर एकही काम होऊ देणार नाही. पाणी व ड्रेनेज लाईन रस्त्याच्या बाजुला असाव्यात असे होत नाही तोपर्यत काम करू देणार नाही संबधीत अधिकारी व ठेकेदार यांचेवर कार्यवाही करावी.

मा.सभापती :पाणीपुरवठा व ड्रेनजची लाईन रस्त्यातून शिफ्टींग झालीच पाहिजे अशी किती कामे ती विना बजेटची होतात तेथील लोकांना घाण पिण्यासाठी मिळू नये. वॉटर सप्लाय लाईन शिफ्ट करायला पाहिजे. समांतरचे काम होण्यास दोन ते अडीच वर्ष लागणार आहे.

श्री.नारायण कुचे :यामध्ये काही पेमेंट अदा केलेले आहे का?खुलासा करण्यात यावा. चौकशी करण्यात यावी.

शहर अभियंता :तपासून सांगण्यात येईल.

मा.सभापती :इंजिनिअरींगचे कर्मचारी तपासणीसाठी मिळणे शक्य नाही. प्रशासनाने सक्षम अधिकारी नेमावे मा.आयुक्तांनी निर्णय घ्यावा. मा.आयुक्तांनी खुलासा केला त्यावर स.सदस्य श्री.आगा खान यांचे समाधान झाले असेल त्यानी त्याचा राजीनामा परत घ्यावा. अंदाजपत्रक असेल देयक असेल क्वॉलीटीचा विषय असेल यासाठी सक्षम अधिकारी नेमावे जे प्रशासनाला योग्य वाटते त्याप्रमाणे करावे.

श्री.समीर राजूरकर :ॲक्शन पाईट दिले त्याचे उत्तर सभापती यांचेकडे आले का? सभापती म्हणुन आपण पिठासीन अधिकारी आहात आपल्याकडे 12 ॲक्शन पाईंटचा खुलासा आला का? शहरात अतिक्रमण विभागातर्फे प्रॅक्टीस सुरू झाली आहे. एखाद्या दोन एकरच्या प्लॉटवरती जर 20 हजार स्के.फिटची परवानगी दिली असेल व बाकीची जागा वादाची असेल त्या जागेवरती तो फेन्सींग करून घेतो. जेव्हा अतिक्रमण विभागाकडे टाऊन प्लॅनिंग विभाग अहवाल पाठवितो की एवढी परवानगी दिलेली आहे याच्यावरती परवानगी दिलेली नाही. स्टे आणण्यासाठी टाईमपास केला जातो. यामध्ये कुठल्या अधिकाऱ्याला/कर्मचाऱ्याला टार्गेट किंवा निलंबन करण्याचा हेतु नाही. जेवढी बांधकामाला परवानगी दिलेली आहे तेवढे बांधकाम त्यानी करावे परंतु जास्तीचे तार फेन्सींग करून मा.न्यायालयाचा स्टे आणला जातो. यामध्ये मनपाची बदनामी आहे. अतिक्रमणबाबत का? नगरसेवकांनी तक्रार करायची प्रशासकीय यंत्रणा काम करणार आहे की नाही. शहरातील काही ऑक्सीजन पॉईंट लॉक करून ठेवण्यात आलेले आहे.

स.सदस्यांनी एखाद्या विषय प्रशासनाच्या लक्षात आणुन दिल्यास किमान त्या विषयावर प्रशासनाने लक्ष द्यायला हवे. अशा पध्दतीने धोरण चालू राहिल्यास भविष्यात शहर भकास होऊन जाईल. 20 हजार स्के.फिटची परवानगी आहे आणि पुर्ण जागेला तार फेन्सींग घालण्यात आलेली आहे. टाऊन प्लॅनिंगने दिलेली परवानगी बरोबर आहे. सभागृहाने अतिक्रमण काढुन टाका म्हणुन आदेशित करण्यात आले परंतु कारवाई करण्यात आले नाही आता त्यावर स्टे आला आहे. मा.न्यायालयाचा अवमान करण्याचा माझा हेतु नाही. या प्रकरणात जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. नसता भविष्यात या शहराची बिकट अवस्था होईल.

श्री.बाळासाहेब मुंडे :कोर्टाचा स्टे असतांना 20 स्के.फुटवर परवानगी दिली का?

उपआयुक्त (प्र) :या संदर्भात मा.सभापती यांनी फोनवरून तेथील पाहणी करण्याचे सूचना दिल्या त्यानुसार मी पाहणी केली तेथे शेड व पत्र्याचे कंपाऊड होते तेव्हा श्री.शेख, इ.नि. यांना तात्काळ सूचना करण्यात आल्या की, पहाणी करून कागदपत्र तपासुन माहिती देण्यात यावी म्हणुन या संदर्भात यांनी म्हटले की 2 ठिकाणी परवानगी दिलेली आहे. बाकीच्या बाबतीत स्टे आलेला आहे त्यावर विधी विभागाचा मत घेण्याचे सुचना केल्या.

मा.सभापती :स्टेचा विषयाबाबत सभागृहाला माहिती देण्यात यावी.

विधी सहाय्यक :यासंबधी प्रशासकीय विभागाकडून कार्यवाहीची संचिका प्रस्तापित करण्यात आली होती दोन ते तीन सुटचा रेफरन्स त्यांनी मागीतला होता. त्यातील जे प्रकरण होते त्याचा संदर्भ मागितला होता जे दावे आहे ते आपआपसातील आहे महापालिकेविरूध्द मनाई हुकूम नाही असा अभिप्राय दिला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :मनाई हुकूम नाही. जे कुणी संबधीत असेल त्यांना आजच्या आज ॲक्शन घेण्याचे सांगावे.

मा.सभापती :आताच विधी सहाय्यक यांनी खुलासा केला त्यानुसार उपआयुक्त (प्र) यांनी माहिती घेवुन आजच्या आज कार्यवाही करण्यात यावी.

श्री.नारायण कुचे :चिकलठाणा येथील पोल्ट्री फॉर्म परवाना घेवून तेथे शोरूमचे काम केले त्या संदर्भात कार्यवाही करणार होते खुलासा घ्यावा.

श्री.समीर राजूरकर :यात जबाबदारी फिक्स केली पाहिजे. शिक्षा कायम लक्षात राहिली पाहिजे की, हि चुक परत करता कामा नये. मा.न्यायालयाचा आदर ठेवुन बोलतो की, प्रशासनाने मा.न्यायालयाचा मनाई हुकूम नसतांना त्या दिवशी फक्त दिड फुट भिंत पाडली. विषय एका अतिक्रमण पाडण्याचा नाही. ही यंत्रणा सुधारणार कधी. प्रत्येक वेळेस नगरसेवकाने मुद्दा मांडायचा नंतर त्यास स्टे आणायचा. हे फक्त प्रशासनाच्या दिरंगाईमुळे होत आहे.

श्री.बाळासाहेब मुंडे :दीड फुटच का पाडले?

श्री.रेणुकादास वैद्य :सेव्हन हिल उड्डाणपुला जवळील कामाबाबत चर्चा झाली होती. याबाबतीत मा.आयुक्तांचे अभिनंदन करायला हवे. त्यांची चौकशी बसवुन काहींना दोषी दरविले. चौकशी योग्य रितीने व्हावी. निलंबीत करणे बडतर्फ करणे ही कार्यवाही अपेक्षीत नाही काम करीत असतांना चुका होतात परंतु कार्यवाही करणारच असेल तर दोषी कोण हे बघण्याची गरज आहे. खालच्या माणसाला मारू नका? ज्यांनी आदेश दिले त्यांचेवर कारवाई करा. चिकलठाणा येथील प्रकरणात जसे कार्यवाही केली तशीच या प्रकरणात व्हायला पाहिजे.

मा.सभापती :चिकलठाणा येथील प्रकरणात चौकशी केली पेपरमध्ये वाचले चौकशी कोणी केली माहिती देणे आवश्यक होते.

**उपआयुक्त (म)** **:दिनांक 19-7-2012 च्या सभेत या संदर्भात आदेशी दिलेले होते त्यानुसार मा.आयुक्त यांनी त्रिसदस्यीय समिती गठीत केली त्यामध्ये उपआयुक्त (म) शहर अभियंता व सहा. संचालक न.र याचा समावेश होता. नगररचना व प्रशासकीय विभागाची संचिका व स्थळ पाहणी या अधारे अहवाल मा.आयुक्ताकडे सादर केला यात मुळ परवानगी केंव्हा दिली ही बाब केंव्हा लक्षात आली मुळ परवानगीपेक्षा वेगळे पध्दतीचे बांधकाम तेथे होत आहे. प्रशासकीय विभागाने काय कार्यवाही केली विलंब कोठे झाला या संबधीचा अहवाल मा.आयुक्तांना दिला त्यात आणखी काही सुचना दिल्या आहेत की गंभीर स्वरूपाच्या बाबी समोर आल्या आजच कागदपत्र मागवावी उपआयुक्त सिडको प्रशासन अधिकारी, नगररचना विभाग यांनी केलेली कार्यवाही किंवा स्थायी समितीने जे जाबबादारी निश्चित करून गुन्हे दाखल करण्याचे आदेशीत केले होते त्यानुसार सादर करावे तसेच बांधकाम स्थगिती तसेच अवैध बांधकाम याची तपासणी करावी. मा.न्यायालयाचे तात्काळ स्थगिती उठविण्यासाठी विशेष प्रयत्न करावे. एमआरटीपी 1966 चे कलम 53(1) अन्वये दिनांक 2-11-2011 सुचित केल्यानंतर म्हणजेच अनधिकृत बांधकाम आहे हे स्पष्ट झाल्यानंतर एक महिण्याच्या मुदतीनंतर नगररचना विभागाने भोगवटा प्रमाणपत्र दिनांक 9-12-2011 रोजी नाकारले होते म्हणजेच एक महिण्याच्या आत हे बांधकाम निष्काषित करणे आवश्यक होते असे समितीचे मत आहे.**

**मा.सभापती** **:प्रशासकीय अधिकारी यांनी सहाय्यक संचालक यांचेकडे संचिका पाठवली होती का आपण शेवटी आला आहात यापुर्वी काय कार्यवाही केली त्या अगोदर काय कार्यवाही केली ते सांगावे.**

**उपआयुक्त (म)** **:गट क्र. 408 चिकलठाणा येथील जागेवर श्री.झवेरी यांना दिनांक 15-1-2009 रोजी 8100 चौ. मी पैकी 1336 चौ.मी. वर शेड बांधण्यासाठी परवानगी दिली होती 31-3-2011 अन्वये सदर बांधकामची मुदत ही 13-1-2012 पर्यंत वाढवून देण्यात आली असे दिसून आले सदरचा सर्वे नं हा औरंगाबाद मंजूर विकास आराखडयानुसार ना विकास क्षेत्रामध्ये समावेश आहे.दिनांक 9-8-2011 रोजी स.सदस्य श्री.चौधरी यांनी बांधकाम विषयी तक्रार केली व बांधकाम परवानगी नुसार होत नसेल तर ते रद्य करावे असे त्यांनी म्हटले होते.त्यानंतर 23-9-2011 नुसार नगररचना विभागाने अर्जदारास मंजूरी नसतांना अंतर्गत बांधकामात बदल करून 2.85 चौ.मी. हॉल मध्ये अंतर्गत सिलींगवर स्लॅब टाकला असून वॉचमन केबीन बाधल्याने कार्यवाही करण्याची प्रशासकीय विभागाला बाब लक्षात आणुन दिलेली आहे. प्रशासकीय विभागाने सदर बांधकाम धारकाला महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 53 (1) नुसार दि. 02.11.2011 रोजी नोटीस जारी केलेली आहे. दिनांक 2.11.2011 नुसार प्रशासकीय विभागाने संबधीतास ते बांधकाम काढून घ्यावे म्हणून नोटीस दिली. संबधीतानी नोटीस घेण्यास नकार दिला त्यामुळे 3-11-2011 रोजी तेथे ती नोटीस चिकटविण्यात आली होती. त्यानंतर श्री.झवेरी यांनी संचिका क्रमांक 314/2012, दिनांक 29-11-2011 रोजी भोगवटा प्रमाणपत्रासाठी संचिका सादर केली परंतु कामात विसंगती असल्याने व इतर त्रुटी असल्याने दिनांक 9-12-11 रोजी ही मागणी फेटाळली 15-11-2011 च्या सर्वसाधारण सभेत या विषयी चर्चा झाली त्यानुसार नगररचना विभागाने प्रशासकीय विभागाला कार्यवाही करण्या बाबत कळविले या विभागाने 2-12-2011 कार्यवाही करणे आवश्यक होते हा अनधिकृत विकास निष्काषित करणे**

आवश्यक होते कार्यवाही झाली नाही ही बाब गंभीर आहे असे चौकशी अहवाल दिले आहे.

**मा.सभापती** :मुदतवाढ कोणत्या तारखेला दिली.

**उपआयुक्त (म)** :31-3-2011 जे मुदतवाढीचे पत्र दिले त्यात 13-2-2012 पर्यत मुदतवाढ दिली होती.

**श्री.समीर राजूरकर** :1 वर्षापासून मुदतवाढ दिली तेव्हा पासून याकडे दुर्लक्ष केले स.सदस्य उपोषनाला बसले होते. 10 हजार लोकांनी निवडूण दिलेल्या स.सदस्यांना खोटे बोलले जाते. का? खोटे बोलायचे एक नाही असे 200 प्रकरणे असतील लोकप्रतिनिधी यांचे लक्षात आल्यानंतरच कार्यवाही होणार का असा प्रश्न पडतो प्रशासनाने वेळीच कार्यवाही करायला पाहिजे प्रशासनाची जबाबदारी आहे. यावर ॲक्शन म्हणजे योग्य ते नियोजन करून कार्यवाही व्हायला पाहिजे. शहरातील लोकसंख्या वाढत आहे घरे होत आहे सुविधा दिल्या जाणार नाही शहराचे वाटोळे होईल कंट्रोल कसे करणार ही सामुहिक जबाबदारी आहे.

**मा.सभापती** :चौकशी करण्याचे आदेश केले होते अहवाल बाबत नाही. हा अहवाल आहे. नगररचना विभागाची चौकशी तो विभाग त्यांचा अहवाल कसा देवू शकतो स्थगिती दिली म्हणता एमआरटीपी ॲक्ट 51 मध्ये काय आहे.

**सहा.संचालक (न र)** :तेथे दिलेल्या बांधकाम परवानगीची मुदत संपल्यामूळे ती आता बांधकाम रद्य करता येणार नाही.यापुढे बांधकाम होणार नाही दक्षता घेता येईल.

**मा.सभापती** :प्रशासनाने या बाबतीत चौकशी का? नेमली नाही.

दुपारी 3 वाजेच्या नंतर सर्व अधिकारी कर्मचारी कार्यालयात हजर असावे तसे प्रशासनाने आदेशीत करावे. आणखी एक अहवाल वाचून दाखवावा.

**सहा.संचालक (न र)** :मौ.गारखेडा विजयनगर जालना रोड न.भु.क्र. 15187 इ 1 ते इ 3 पर्यत दिनांक 28-5-2009 प्रमाणे बांधकाम परवानगी देण्यात आली भुखंडाचे एकूण क्षे. 2252 असून 2190 स्क्वे. मी बांधकाम क्षेत्र आहे सदरच्या भुखंडा बाबत सार्वजनिक रस्त्यासाठी 4 मी. रूंद जागा संपादीत करणे व सदर भुखंडा बांधकाम परवानगी देण्याचा निर्णय आरसीएस नं 388 2005 मध्ये मा.न्यायालयाने दिला आहे. मा.न्यायालयाच्या सदर निर्णयानुसार अर्जदार यांनी 4 मी. रूंद जागा त्यांचे भुखंडातून दिली आहे. उक्त मिळकतीच्या मिळकत पत्रिके नगर भुमापन अधिकारी औरंगाबाद यांनी दिनांक 11-1-2012 अन्वये रद्य केलेल्या आहेत. सदर रद्य झालेल्या मिळकत पत्रिके संबधी विधी सल्लागार यांचे ओपनीयन घेण्यात आले विधी् सल्लागार यांनी संबधीताकडून खुलासा घेण्याचे सांगितले उक्त प्रकरणी बांधकाम परवानगी धारकानी मा.न्यायालयाच्या प्रती सादर केल्या नसल्याने व बांधकाम परवानगीची मुदत संपली असल्याने उक्त बांधकाम बंद करणे बाबत 6-7-2012 रोजी प्रशासकीय अधिकारी यांना कळविले आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :बांधकाम परवानगी दिल्यानंतर त्यांनी संचिका सादर केली. ते आपण रिजेक्ट केले मालकी हक्क सिध्द होत नाही. तरी आज घडीला तेथे बांधकाम चालू आहे. आम्ही निदर्शनास आणून दिले प्रशासनाने योग्य कार्यवाही करावी.

**मा.सभापती** :प्रशासनाला वेळोवेळी सुचना देवून कार्यवाही होत नाही. सक्षम सभागृह आहे त्या ठिकाणी बांधकाम आजही चालू आहे. चौकशी चालू आहे. दूकांनाचे उद्‌घाटन झाले आहे. सभागृहाच्या सूचनांकडे प्रशासन पुर्णतः दुर्लक्ष करीत आहे. 2010 परवानगी बंद झाली पुन्हा मुदत देण्याचे कार्यवाही होते. पीआर कार्ड म्हणजेच मालकी हक्क रद्य झाल्यानंतर काय कार्यवाही होणार आहे.त्यांना नोटीस दिली का? आपली परवानगी रद्य झाली रद्य झाल्याबाबत कळवीले का?.

| | |
|---|---|
| | सर्व चौकशी का? केली नाही जे लोक दोषी आढळले त्यांची सुनावणी घेतली का? दोन्ही बाजू ऐकुण घेतल्या पाहिजेत. हे तर छोटे छोटे मासे आहेत मोठी मगर कोण आहे. जो विषय आम्हाला पाहिजे आहे तो स.संचालक न.र. बोलत नाही. मा.आयुक्त यांनी याची 02 दिवसात चौकशी करून ताबडतोब कार्यवाही करावी. ॲक्शन पाईन्ट 1 उड्डाण पुला स्ट्रीट लाईट टाकणे बाबत काय कार्यवाही केली. |
| कार्य.अभियंता(विद्युत) | :या बाबत अंदाजपत्रक तयार करण्यात आले. बजाज कंपनीकडून एक पायलेट प्रोजेक्ट बनवून जीआरपी पोल लावण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. 3 पोल अगोदर लावणार आहे चांगले वाटले तर त्यानुसार कार्यवाही करणार आहोत. |
| मा.सभापती | :दुसरा ॲक्शन पॉईन्ट मराठवाडा सांस्कृतिक मंडळा जवळील काम सुरू केले का |
| शहर अभियंता | :40 लक्षच्या अंदाजपत्रकानुसार काम सुरू नाही ताबडतोब तात्पुरते रिलीप मिळाला म्हणून काम सुरू केले. |
| मा.सभापती | :ॲक्शन पॉईन्ट क्र.10 डिझेल व पेट्रोलवर व्हॅट बाबत माहिती घेतली का ?जी आर मध्ये काय आहे. |
| एलबीटी सहाय्यक | :माहिती घेणे चालू इतर महापालिकेकडून माहिती मागविली आहे.जीआर मध्ये स्पष्ट दिले नाही लवकरच कार्यवाही होईल. |
| मा.सभापती | :ॲक्शन पॉईन्ट 11 रजिष्ट्री चे 8 कोटी येणेसाठी काय कार्यवाही केली |
| मुख्यलेखाधिकारी | :विशेष प्रतिनिधी यासाठी मुंबईला पाठविले होते त्यापैकी 2 कोटी मिळाले बाकी पैसे मिळेण्याची शक्यता आहे. |
| मा.सभापती | :संबधीत अधिकारी यांना परत मुंबईला या साठी पाठविण्यात यावे.12 नंबरचा खुलासा करावा. |
| मुख्य लेखाधिकारी | :संगणक खरेदीचा हा विषय आहे अहवाल असा की वार्ड कार्यालयात 1 एप्रिल 2012 पासून संगणक ावर काम करण्यात आले त्यासाठी लागणारे युपीसी 6 प्रीटंर 6 व टोनर 100 यासाठी 13.27 लक्ष खर्चास तत्कालीन आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांनी मान्यता दिली आहे मान्यतेच्या वेळी आर सी स्पेसिफिकेशन नुसार हे खरेदी करावे याबाबत देयक भक्ती कॉप्युटर आले आहे भक्ती कॉप्युटर यांना कार्यादेश दिला त्यावर मा.आयुक्त यांची मंजूरी नव्हती. हे महापालिकेसाठी खरेदी करीत असल्याने स्थानिक संस्था करात त्यात सुट देण्यास सक्षम अधीकारी यांची मान्यता नाही. युपीएस व प्रिटंर हे दर कराराप्रमाणे खरेदी केली त्यात भक्ती कॉम्प्युटर म्हणून उल्लेख नाही. तेव्हा दर हे शासनाने निश्‍चित होते त्याप्रमाणे खरेदी करणे आवश्यक होते सदरील खरेदी ही नियमाला धरून झाली नाही. |
| मा.सभापती | :अहवाल मा.आयुक्ताकडे दयावा नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :एलबीटी लागू झाली. यात वाईन शॉप, बेअर बार, बेअर शॉपी यांचे डिलर्स बाहेरच्या डिलर्स कडून माल घेतला जातो त्याचे बिले लोकला नसतात जे येथील डिलर्स आहे ते रेग्यूलर एलबीटी भरत असतील किती करोडचे मटेरियल येते. बाजूच्या ठिकाणहून माल डिलर्सच्या नावाने घेता तो डायरेक्ट शहरातील गोडाऊमध्ये लोड करतो ते मटेरियल बेअर बार बेअर शॉपी वाईन शॉपला जातो त्यातून महापालिकेला उत्पन्न येत नाही.जकात होती तेंव्हा प्लाऊड वाले महापालिकेला 30-40-50 हजार प्रत्येक जण भरत असे आता 3-4 हजार भरणा करता ट्रॉन्सपोर्ट मार्फत माल येतात तेथील काही एजन्सी आपल्या अधिका-याच्या मार्गदर्शनाखाली आहे. उदा. जेन ॲण्ड सन्स कंपीन अस्तित्वात आहे येथे इतर एजन्सीच्या नावाने मटेरियलही येते परंतु आपण फक्त जेन ॲण्ड संन्स कंपनीकडून 5-7 हजार एलबीटी घेतो करोडो रूपयाचा माल येतो परंतु त्याची |

तपासणी होत नाही. वर्षभरात एका ही ठिकाणी छापे मारले नाही.उत्पन्न बुडते यासाठी हे करायला पाहिजे अशा गोडाऊन तपासणी केली पाहिजे 5-7 कोटी येवू शकतात मागिल बैठकीत म्हटले होते काही दर कमी केले. आजही शासनाच्या मंजूरीच्या अधीन राहून एलबीटी आकारली जाते ही जबाबदारी आजच संबधीत प्रमुख तेथील कर्मचारी यांचेवर फिक्स करावी चांगले काम केल्यास 300 कोटी रूपये मिळू शकतील सरसगट रक्कम आकारून दुकान दाराकडून इतर व्यापारी यांचेकडून एलबीटी वसूल होते. पाहणी तपासणी केली जात नाही करीता यावर स्वतंत्र बैठक आयोजित करावी.

**श्री.विजेंद्र जाधव** :मागिल बैठकीत मी काही माहिती मागविली होती आपण आदेशीत केले होते परंतु मा.आयुक्ताच्या परवानगी शिवाय माहिती देणार नाही असे उत्तर मिळते.

**श्री.रेणुकादास वैद्य** :या विभागाला अपडेट करायचे असेल तर एलबीटी विभागात सुधारणा झाली पाहिजे चांगले काम करणारे कर्मचारी आहे त्या क्षेत्रात काम करणारे आहे त्यांना तेथे दयावे यांना काढावे ही प्रॅक्टीस बंद होईल.

**श्री.नारायण कुचे** :वखार्ड कंपनीचा कच्च्या मालावर एलबीटी लावले जातो का? 80 लक्ष कच्च्या मालावर व्हॅट येतो एलबीटी का वसूल होत नाही

**श्री.विजेंद्र जाधव** :100 कोटीच्या वर टर्न ओव्हर काही कंपनीचे असतांना यादीत नाव नाही.

**श्री.पाटणी,** एलबीटी प्रमुख :स.सदस्य यांनी लहान मोठया कंपनी किती त्या एलबीटी पेड करतात का प्रत्येक कंपनीला एलबीटी किती वसुल किती होते याबाबतची माहिती विचारली होती 7 तारखेला माहिती देण्यात आली आहे. कपंनी निहाय माहिती विचारली होती. ते अधिकार माझे नाही मी ती संचिका प्रोसेसमध्ये आणली.

**मा.सभापती** :वखार्ड कंपनी वर्षाला किती एलबीटी भरते.

**श्री.पाटणी,**एलबीटी प्रमुख : वखार्ड कंपनीने जुलै पासून 3 महिण्यात 2 कोटी एलबीटीचे भरले आहे. हे माझे कार्यवाही अंतर्गत नाही संचिका सादर केली कार्यवाही पुर्ण होईल तेंव्हा माहिती दिली जाईल. 28-4 नुसार त्यांनी प्रोसीसींग युनीट असल्यामूळे, तो अर्ज रिजेक्ट केला त्यानंतर त्यांनी पुन्हा 28-6 ला जो माल भारताच्या क्षेत्रा बाहेर जातो त्यासाठी वापरला जाणारा मालावर एलबीटी माफ करण्यात यावा असे पत्र दिले ते रिजेक्ट केले.त्या प्रमाणे त्यांनी कोर्टात रिट पिटीशन दाखल केले ही कार्यवाही चालू असतांना त्यांचे विवरण पत्र आपण तपासणीला घेतले होते त्यानुसार जवळपास 1.25 कोटी रूपयाचे त्यांचेवर 15 जानेवारी पर्यत सहा माही विवरण पत्र देण्याचा वेळ दिला होता ते तपासणी घेतले सुनावणी करून तो अहवाल सादर केला व जे निर्धारक आदेश आहे तो आपण बजावला या आदेशाच्या अगेन्स्ट मध्ये पुन्हा रिट पिटीशन दाखल केले आणि मा.न्यायालयाकडून मनाई हुकूम घेतला की त्यांचेवर ॲक्शन घेण्यात येवू नये.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :एलबीटी लागू झाल्यापासून का वसुल केले नाही.

**श्री.पाटणी,**एलबीटी प्रमुख :1जुलै पासून एलबीटी लागलेली आहे.3 महिण्याचे पैसे भरले. बाहेर जाणाऱ्या मालावर परस्पर एलबीटीची सुट घेण्यास सुरूवात केली कोर्टाच्या हे निदर्शनास आणुन दिले.

**मा.सभापती** :संधी का दिली.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :कच्चा माल आणणार प्रोडक्शन करणार तर सुट का दयावी.

**एलबीटी प्रमुख-श्री पाटणी** :मा.न्यायालयाचे ॲक्शन घेवू नये अशी त्यास मंजूरी दिली आहे सोमवारी त्याची सुनावणी ठेवण्यात आली आहे. त्यांना निर्धारण आदेशा बरोबर डिमांड नोटीस दिली होती मालमत्ता कर ज्या प्रमाणे वसुल केला जातो त्याप्रमाणे हे वसुल केले जाईल अशी नोटीस दिली त्या अगेन्स्टमध्ये कोर्टात गेले. अशी कोणतीही ॲक्शन घेवू नये असे मा. न्यायालयाचे निर्देश आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य :मागिल वर्षीचा एलबीचा डाटा व या वर्षीचा डाटा घेवून मिक्स करावा किती प्रमाणात वाढ झाली कळेल. आठ दिवसाचे विचारात घ्यावे 50 कोटीचे उत्पन्न वाढेल.**

**मा.सभापती :0.25 प्रमाणे कमी करून महापालिकेचे नुकसन का केले तसेच प्लायवूड संदर्भात प्रश्न केला एलबीटीतून उत्पन्न कमी का येते. आता नाके राहिले नाही लोक रात्री माल आणतात रात्रीतून डिस्ट्रीब्युट करतात.कुठेतरी धाड टाकली पाहिजे. थोडक्यात माहिती दयावी.**

**मुख्यलेखा परीक्षक :एलबीटी विभागाचे ऑलरेडी ऑडीट सुरू करण्यात आले.**

**श्री.रेणुकादास वैद्य :जकात प्रमाणे अॅव्हरेज घ्यावे प्रत्येकाचा डिफरंट किती हे ठैवावे.**

**मा.सभापती :ताबडतोब ऑडीट करावे जे दोषी असेल रिपोर्ट मध्ये यावे**

**एलबीटी प्रमुख श्री.पाटणी:1 जुलै 11 पासून एलबीटी लागू झाले व्यापा-यानी 11 निवेदने जे जकातीच्या दरापेक्षा एलबीटीमध्ये जास्त आले होते त्यावर मा.आयुक्ताच्या आध्यक्षतेखाली बैठक होवून सुनावणी झाली व या संदर्भात 11-11-2011 रोजी मा.प्रधान सचिव यांचेकडूही या संदर्भात बैठक झाली**

**मा.सभापती :दर कमी करतो स्थायी समिती सर्वसाधारण सभेपूढे का आले नाही.**

**एलबीटी प्रमुख श्री पाटणी:नियमानुसार मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान आहे.**

**मा.सभापती :नुकसान करण्याचे अधिकार नाही वाढविण्याचे अधिकार आहे. असे असेल तर बॉडी कशासाठी अस्तित्वात आली.मुख्यलेखापरीक्षक यांनी पुढील स्थायी समिती सभेपर्यंत 0.25 प्रमाणे किती नुकसान झाले अहवाल दयावा**

**श्री.रेणुकादास वैद्य :शासनाकडे हे दर पाठविले मंजूरी नसतांना त्याप्रमाणे आकारतो याची जबाबदारी सुध्दा फिक्स करावी.**

**श्री.समीर राजूरकर :प्लॅट रेट काय आहे.**

**श्री.पाटणी,एलबीटी प्रमुख :गहू ज्वारी बाजरी हे धान्य आहे यावर 1 रू क्विटल प्रमाणे घेत होतो एलबीटीमध्ये याचे दर 0.25 आले त्याप्रमाणे कंटिन्यु केले शेंगदाणे साखर यावर 1 टक्का घेत होतो. एलबीटीमध्ये 2 टक्के शेडूल मध्ये आले त्यावर आब्जेक्शन आले.जकात मध्ये ज्यावर रेट 2 टक्के हे जास्त होते ते एलबीटीमध्ये कमी करून 0.25 प्रमाणे प्रस्तावित केले.**

**मा.सभापती : अहवालानंतर स्पेशल एलबीटीवर बैठक आयोजित करू.**

**श्री.मोहन मेघावाले :सलीम अली सरोवर येथे चालू असलले कामास सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समितीची परवानगी न घेता मुदतवाढ दिली. काम केले रक्क्म खर्च केली त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे.**

**उपअभियंता श्री.सिद्यीकी :या संदर्भात एजन्सीला पीएमसीला नोटीस दिली आहे. दंडात्मक कार्यवाही नंतर करता येईल. त्यांचे रेट केलेले आहे त्या रेट मध्ये तो प्रोजेक्ट करून दयायचा आहे**

**मा.सभापती :20 लक्ष वाढवून का दिले. टन्की बेसेस म्हणजे टोटल प्रोजेक्ट आला.**

**उपअभिंयंता श्री.सिद्यीकी :ते प्रोजेक्टच्या स्कोपचे बाहेरचे काम आहे. 20 लक्ष मध्ये खुले ड्रेनेज चे मुख्य ड्रेनेज मध्ये अॅटच करून मास्टर चेंबर मध्ये टाकतो.**

**मा.सभापती :याची माहिती स्थायी समिती समोर यावी.**

**श्री.मोहन मेघावाले :1 लक्षचे काम होत नाही 20 लक्षचे काम परस्पर दिले जाते.ड्रॉईंग काढलेले होते का?**

**उपअभियंता :31 मार्च 12 पर्यंत मुदत होती एकदाच सहा महिण्याची मुदत दिली दंडात्मक कार्यवाही शिवाय मुदतवाढ दिली जाणार नाही.पुढील महिन्यात पहिल्या आठवडयात काम पूर्ण होईल**

**मा.सभापती** :शासनाचे यासाठी अनुदान आहे वेळेत काम न झाल्यास शासनाने अनुदान परत मागविले तर कोण जाबबदार असणार आहे. पुढील बैठकीत याची सविस्तर माहिती सादर करावी.

**विषय क्र. 16 :** (विषय क्र. 12 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 19/07/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती** :स्थगित करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यांत यावा. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 17 :**

आयुक्त, महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिका औरंगाबाद नागरी हिवताप विभागाअंतर्गत अळीनाशके व किटकनाशके औषधी खरेदी बाबत ई टेन्डरद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या त्या खालीलप्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| | प्राप्त निविदा | पात्र निविदा | अपात्र निविदा |
|---|---|---|---|
| | 04 | 03 | 01 |
| एकुण : | 04 | 03 | 01 |

वरील पात्र निविदामधुन सर्वात कमी दर असलेल्या निविदा धारकाचे दर खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | अळीनाशके/ किटकनाशकांची नांवे | एजन्सीचे नावे | वार्षिक खरेदी | निविदा प्राप्त दर | वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|---|---|---|
| 01 | मलेरिया ऑईल | मे.आशिष डायकेम कार्पोरेशन मुंबई | 5000 लिटर | 68 रूपये प्रति लिटर | 66 रूपये प्रति लिटर |
| 02 | बी.टी.आय. लिक्वीड | मे.आशिष डायकेम कार्पोरेशन मुंबई | 500 लिटर | 1000 रूपये प्रति लिटर | 1000 रूपये प्रति लिटर |
| 03 | आबेट | मे.श्रीराम ॲग्रो मोर्शी अमरावती | 1500 लिटर | 849 रूपये प्रति लिटर | 845 रूपये प्रति लिटर |
| 04 | पायरेथम | मे.श्रीराम ॲग्रो मोर्शी अमरावती | 1000 लिटर | 869 रूपये प्रति लिटर | 865 रूपये प्रति लिटर |

सदरील अळीनाशके व किटकनाशके खरेदी करण्यासाठी चालु वर्षाकरीता 49.25 लक्ष रूपयांची आर्थिक तरतुद करण्यात आली आहे. पैकी वरील वार्षीक खरेदीसाठी र.रूपये 29,62,500/- खर्च अपेक्षीत आहे.

अ.क्र.1 ते 4 वरील दोन कंत्राटदाराचे दर सर्वात कमी असून सदरील कंत्राटदाराच्या दरास पुढील एका वर्षाकरीता मान्यता देण्यास्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेस मंजुरीस्तव सविनय सादर.

**श्री.समीर राजूरकर** :डिस्ट्रीब्युशन कसे करणार आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :संबधीत एजन्सीला विचारणा करण्यात आली का? काम करण्यास तयार आहे का?

**मलेरिया प्रमुख** :आतापर्यंत मागणी केली नव्हती मागच्या वेळेस जे टेंडर काढले त्यांना आपल्याकडून औषधी देण्याचे ठरविले आहे. आतापर्यंत औषधी शासनाकडून घेत होतो व आपल्याकडील कर्मचा-यांना देत होतो.

**मा.सभापती** :शासन देत नाही का ?फवारणी कशी करणार माहिती दयावी

**मलेरीया प्रमुख** :शासन देत होते परंतु आपली जी मागणी आहे जो कोटा होता तो पुर्ण आणून घेतला. या वर्षात जास्त फवारणी होत आहे कमी पडत आहे

**श्री.बाळासाहेब मुंडे** :औषध निष्कृष्ठ दर्जाचे असते डास जंतुवर परीणाम होत नाही.

**मा.सभापती** :यासाठी खर्च शासन की महापालिका करणार आहे. यासाठी परत शासनाकडे विनंती करून मागणी करावी शासनाचा निधी असेल तर ठिक आहे.

**मलेरिया प्रमुख** :या संदर्भात बैठक होती त्या बैठकीत सुध्दा असे सांगण्यात आले की महापालिकेने त्यांचे स्तरावर औषधी खरेदी करावी.

**मा.सभापती** :शासनानेच ही औषधी दयावी खर्च दयावा म्हणून मा.आयुक्तांच्या सहीचे पत्र पाठवावे मा.महापौराचे पत्र दयावे हा विषय रद्द करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्ताव सर्वानुमते रद्द करण्यांत आला.

**<u>विषय क्र. 18 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या ताब्यात अधिकारात असलेले मोहल्ला एन-12 येथील स्वामी विवेकानंद उद्यानालगत मजनुहील येथील कारगील स्मारक ही वास्तु ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट, औरंगाबाद या संस्थेस प्रशिक्षण सुरू करणेसाठी मा.सर्वसाधारण सभा दि.21/12/2009 ने ठराव क्रमांक 804 नुसार दिलेल्या मान्यता संबंधाने प्रथम 11 महिन्यासाठी प्रतिवर्ष रू.55,300/- भाडे आकारणी करून नेहमीच्या अटी शर्तीस अधिन राहुन यापुर्वी देण्यात आलेली आहे. सदरील संस्थेचा 11 महिन्याचा भाडे पट्टा करारनाम्याची मुदत संपली असून संबंधीत संस्थेने सदर भाडेपट्ट्याचे कालावधीत पुढील 10 वर्षासाठी मुदतवाढ मिळण्यासाठी मागणी केली आहे. सदरील मागणीस यापुढील कालावधीकरीता भाडे वाढ करून सुधारीत करारनामा करण्याचे कार्यवाही संबंधाने प्रशासकीय मान्यता होऊन प्रतिवर्ष रू.1,20,000/- प्रमाणे भाडे निश्चिती करण्यात आली आहे, याशिवाय व इतर कर (सामान्य कर), अकृषी कर, सेवा शुल्क व सेवाकर इत्यादीचा वेगळा भरणा करण्यात येईल. महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीस अधिन राहुन मा.स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेस अधिन राहुन संबंधीत संस्थेकडून अनामत रक्कम रू.1,20,000/- एक वर्षाचे आगाऊ भाडे रक्कम रू.1,20,000/- सेवाकर रक्कम रू.25738/- व अकृषीकर रू.3947/- असे एकूण रक्कम रू.2,87,614/- इत्यादी रक्कमेचा भरणा करून घेऊन पुढील कालावधीकरीता भाडे पट्टा करारनामा करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने सदरील प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**मालमत्ता अधिकारी** :महापालिकेच्या ताब्यातील मजनुहील येथील कारगील स्मारक ही वास्तू लोकल सेल्फ गव्हरमेट औरंगाबाद शाखेसाठी या शाखेद्वारे महापालिकेला प्रशिक्षण वगैर यासाठी मदत करीत असते 11 महिण्यासाठी भाडयाने दिले होते दर वर्षी 10 टक्के दर वाढ करून देणार आहे.

**मा.सभापती** :मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या ताब्यात अधिकारात असलेले मोहल्ला एन-12 येथील स्वामी विवेकानंद उद्यानालगत मजनुहील येथील कारगील स्मारक ही वास्तु ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट, औरंगाबाद या संस्थेस पुढील 10 वर्षासाठी प्रतिवर्ष रू.1,20,000/- प्रमाणे भाडे आकारणी करण्यास आणि इतर कर (सामान्य कर), अकृषी कर, सेवा शुल्क व सेवाकर इत्यादीचा वेगळा भरणा करून घेवून नेहमीच्या अटी शर्तीस अधिन राहुन एकूण रक्कम रू.2,87,614/- भरणा करून घेऊन पुढील कालावधीकरीता केलेल्या भाडेपट्टा करारनाम्यास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद